# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०३/०८/२०२६ (सोमवार )**

.......................................................................................

## पोलीस ठाणे पाचगाव हद्दीतील मौजा चांपा पारधी बेडा अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या आरोपींवर ०२ गुन्हे नोंद, ०१ लाख ४३ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव :—** दिनांक ०३/०८/२०२६ रोजी पाचगाव पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा चांपा पारधी बेडा येथे महिला आरोपी या त्यांचे घराचे बाहेर खुल्या जागेत मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू गाळत आहे. अशा गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर बातमीवरून मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. मयंक माधव, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पाचगाव पोलीसांनी मौजा चांपा पारधी बेडा घटनास्थळावरील रनिंग हातभट्टया नष्ट केल्या.

**०२ महीला आरोपी यांचेवर कारवाई करत घटनास्थळावरून दोन्ही कारवाईत पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण १९०० लिटर मोहाफुल सडवा, २४० लिटर मोहाफुल गावठी दारू, रनिंग भट्टी मध्ये उकळलेले २०० लिटर मोहाफुल रसायन सडवा प्लास्टीक आणि लोखंडी ड्रम ,जळाउ लाकुड, पाईप तसेच दारू गाळण्याचे इतर साहीत्य असा एकुण १,४३,०००/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०२ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**







# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०७ गुन्हे नोंद

दिनांक ०२/०८/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, विदेशी दारू, मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, ईतर साहित्य असा एकुण ३७,६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे दिवाकर गोविंदराव वानखेडे, वय ५२ वर्ष, रा. वडेगाव उमरी, त. नरखेड याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे लक्ष्मण नागोराव पवार, वय ३४ वर्ष, रा. बाजारगाव याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे १) राजेन्द्र जर्नाधन पवार, वय ५१ वर्ष, रा. हिवरमठ, ता. नरखेड २) महिला आरोपी हिचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन मौदा येथे** गौतम कैलासजी मेश्राम, वय ३५ वर्ष, रा. धानला ता. मौदा याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद येथे** राजकुमार उर्फ बन्सी सुर्यवंशी, रा. सावळी, ता. सावनेर, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे** आरोपी १) मिलींद हरिदास कोसारे, वय ५६ वर्ष, रा. दत्तवाडी २) निखील प्रफुल भागवतकर, रा. दत्तवाडी ३) दिपकिशोर नंदकिशोर गुप्ता, रा. दत्तवाडी याचेवर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ४६८० मिली देशी दारू, १४४० मिली विदेशी दारू, १०० लिटर मोहाफुल दारू, ६०० लिटर मोहाफुल रसायन सडवा, इतर साहित्य असा एकुण ३७,६००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०५ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ०२/०८/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयात विशेष मोहिम राबवुन अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०५ आरोपीतांवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन सावनेर** अंतर्गत आरोपी मंगेश राधेश्याम भलावी, वय २५ वर्ष, रा. चिचपूरा सावनेर हा हजरतशहा बाबादरगाह, सर्वोदय नगर सावनेर येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कोंढाळी** अंतर्गत आरोपी नामे १) अभिजित संजय कुंभरे, वय २१ वर्ष, रा. सातनवरी २) आदेश शंकरराव उईके, वय २७ वर्ष, रा. सातनवरी ३) अतुल तुळशिराम भारसाकरे, वय ३५ वर्ष, रा. जुनगड, ता. सेलु जि. वर्धा, ह. मु. सातनवरी ४) सचिन शंकरराव सलामे, वय ३२ वर्ष, रा. खैरी गोसावी, ता. जि. नागपुर हे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. ०५ आरोपीतांवर कलम २७ एन. डी. पी. एस कायदयान्वये प्रत्येकी १ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**